# नागरिकशास्त्र बदलावे की मतदारांची मानसिकता

- राहुल बैस

येत्या १५ ऑक्टोबर २०१४ रोजी कशासाठी मतदान करणार आहात? अलीकडेच एका प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विदर्भातील वेगवेगळ्या जिल्ह्यामधून आलेल्या ४९ ग्रामीण स्त्री-पुरूषांना हा प्रश्न विचारण्यात आला. महाराष्ट्रात सरकार बनविण्यासाठी, मुख्यमंत्री ठरविण्यासाठी, आणि एखाद्या पक्षाला बहुमत देण्यासाठी असा मुख्य सुर ऐकायला मिळाला. फार कमी व्यक्तींनी आमदार निवडण्यासाठी असे उत्तर दिले.

मग या निवडणुकीला 'महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक' असे नांव का देण्यात आले? हा उपप्रश्न उपस्थितांना जरा गोंधळात टाकणारा होता. त्यावर आमदार हेच विधानसभेचे सदस्य असतात, आणि त्यांची निवड करायची असल्याचे काही जाणत्या व्यक्तींनी सांगितले.

कोणत्या कामासाठी निवड करायची हे माहीत असल्यास योग्य व्यक्तीची निवड करणे सोपे जाते; हे सर्वसामान्य तत्त्व उपस्थितांना पटले. त्यामुळे आमदार (म्हणजेच विधानसभा सदस्य) यांचे काम काय असते, असा पुढचा प्रश्न विचारण्यात आला. याचे उत्तर देण्याचे धारिष्ट्य कोणालाच होत नसल्याने हा प्रश्न सोपा करावा लागला. आपल्या मतदारसंघात गेल्या पंधरा वर्षातील आमदारांपैकी आवडलेल्या आमदाराचे स्वतःला पसंत आलेले काम विचारण्यात आले.

'विकास केला' या शब्दांमध्ये साधारणपणे पसंतीचे सार येत होते. रस्ते, पूल, उड्डाणपूल, नाली, प्रवासी निवारा, समाजमंदीर, तीर्थक्षेत्र, वाचनालय, क्रीडांगण, इत्यादि मधून उपस्थितांना आवडलेला विकास झळकत होता. निराधार योजना, घरकूल योजना, आदि सरकारी योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळवून देणारे आमदार प्रथम पसंतीचे पात्र होते. गोरगरीबांची कामे करणारे, म्हणजे एखाद्या गरजू गरीबाला मुंबईतील दवाखान्यात ऑपरेशनची सोय करणारे आणि युवक-युवतींना उच्च शिक्षण किंवा नोकरीची सोय करून देणारे आमदार आवडतात असेही लक्षात आले. शेतकरी, अपंगत्व असलेले व्यक्ती, आणि स्त्रियांच्या प्रश्नांवर आंदोलन करणाऱ्या आमदारांप्रती उपस्थितांमध्ये आदरयुक्त कृतज्ञताभाव दिसून आला

उपस्थितांपैकी मतदार नसलेला एकमेव व्यक्ती म्हणजे आपल्या आईसोबत आलेल्या सातव्या वर्गात शिकणाऱ्या एका चुणचुणीत मुलाने त्याच्या क्षेत्रातील विद्यमान आमदाराबद्दलचे सकारात्मक मत ठासून मांडले रस्ते, नाली, इत्यादि विकासकामांसाठी त्याला हे आमदार खुप आवडले होते. मात्र शालेय नागरिकशास्त्राच्या पुस्तकाप्रमाणे आमदाराच्या कामाबद्दल त्याला काहीही सांगता आले नाही. सातव्या वर्गाच्या नागरिकशास्त्रात विधानसभेबाबतचा धडा सर्वात शेवटी असल्याने त्याच्या अभ्यासात अजून आलेला नव्हता.

सातव्या वर्गाच्या नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तकाप्रमाणे विधानसभेची (म्हणजे सर्व आमदारांची) तीन कामे आहेत.

१) विधान कार्ये - राज्याच्या अधिकारक्षेत्रांतर्गत गरजेप्रमाणे नवीन कायदे बनविणे (पारीत करणे), विद्यमान कायदांमध्ये गरजेप्रमाणे सुधारणा घडविणे (पारीत करणे), कायदे लोकाभिमुख असण्याची दक्षता घेणे, इत्यादि.

२) आर्थिक कार्ये - राज्याचे वार्षिक आर्थिक अंदाजपत्रक (बजेट) मंजूर करणे, आर्थिक अंदाजपत्रकाच्या माध्यमातून लोकाभिमुख योजना व त्यासाठीच्या निधीची तरतूद करणे, इत्यादि.

३) नियंत्रणात्मक कार्ये - मंत्रीमंडळाच्या कारभारावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, एकंदर शासकीय व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, इत्यादि.

अगदी हीच तीन कार्ये लोकसभेसाठीही असल्याचे या पाठ्यपुस्तकात लिहले आहे.

विधानसभेचे विश्वासमत प्राप्त असे पर्यंतच मंत्रीमंडळ पदावर स्थापित असू शकते. विधानसभेचे विश्वासमत गमावताच मुख्यमंत्रीला मंत्रीमंडळासह राजीनामा द्यावे लागते. हा विधानसभेचा विशेषाधिकार आहे.

नागरिकशास्त्राच्या पाठ्यपुस्तकातील धडा तज्ज्ञ व्यक्तींनी संविधानाच्या आधारे लिहला असल्याचे आपल्याला माहीत आहे. म्हणजेच ही तीन संवैधानिक कर्तव्ये पार पाडण्याची उत्तम क्षमता असलेले आमदार आपल्याला हवेत. मग 'मतदारसंघाचा किंवा महाराष्ट्राचा विकास' या एकाच मुद्द्यावर चाललेला सर्वपक्षीय आणि अपक्षीय उमेदवारांचा प्रचार चुकीचा नव्हे काय?

विकासाचा मुद्दा हा विधानसभेच्या 'आर्थिक कार्य' सोबत संबंधीत आहे. आर्थिक अंदाजपत्रकाच्या माध्यमातून लोकाभिमुख योजना व त्यासाठीच्या निधीची तरतूद करणे आणि निरंतर पाठपुराव्यातून त्या योजनांची संबंधीत शासकीय यंत्रणा किंवा प्रशासनामार्फत अंमलबजावणी घडवून आणणे असे त्याचे स्वरूप आहे. कुठल्याही प्रकारे विधानसभेकडे (म्हणजेच सर्व आमदारांकडे) प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम नाही. मंत्रीमंडळ आणि एकुण शासकीय यंत्रणेवर देखरेख आणि नियंत्रणाचे काम मात्र विधानसभेने (म्हणजेच आमदारांनी) करायचे आहे. त्याबद्दल कोणताही राजकीय पक्ष, अपक्ष किंवा उमेदवार आश्वासन देतांना दिसत नाही.

नागरिकशास्त्राच्या दृष्टीने समजून घ्यायचे तर आजपर्यंत उघडकीस आलेले आणि उघडकीस न आलेले राज्य सरकारचे सर्व आर्थिक घोटाळे हे आमच्या आमदारांच्या (विधानसभेच्या) निष्क्रियतेमुळे घडलेले आहेत. विधानसभेने आपले 'नियंत्रणात्मक कार्य' व्यवस्थित पार पाडलेले नसल्याचे हे घोटाळे द्योतक आहेत.

कायदे किंवा कायद्यातील सुधारणा पारीत करण्यासंबंधीच्या विधानसभेतील चर्चेत आमदारांचा प्रत्यक्ष सहभाग आणि संबंधीत राजकीय पक्षांचे आमदारांवर असलेले 'व्हीप' आदि रूपाने दबाव या 'विधान कार्य' संबंधी त्यांची अनास्था दर्शवित असतो.

नागरिकशास्त्रानुसार विधानसभा बहुमताने आपला एक नेता निवडते ज्याला राज्यपाल 'मुख्यमंत्री' म्हणून मान्यता व शपथ देतात. प्रत्यक्षात मात्र दिल्ली किंवा मुंबईतील संबंधीत राजकीय पक्ष प्रमुख निर्देश देतील त्या व्यक्तीची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याचे दाखविले जाते.

नागरिकशास्त्राचे पाठ्यपुस्तक असेही स्पष्ट करते की आमदार हे विशिष्ट विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधी असतात. सर्वसाधारण भाषेत आपण त्यांना 'लोकप्रतिनिधी' संबोधतो. विधानसभेची विधान कार्ये, आर्थिक कार्ये, आणि नियंत्रणात्मक कार्ये, या तिन्ही कामात आपल्या मतदारसंघातील लोकांचे सर्वसाधारण मत विधानसभेत पोहचविणे आणि विधानसभेचे मत लोकांपर्यंत पोहचविणे असे दुहेरी संवादाचे कार्य प्रतिनिधींकडून अपेक्षित आहे. एखाद्या मतदारसंघातील लोकप्रतिनिधीने असे लोकांचे मतसंग्रहण करण्याची व ते विधानसभेत पोहचविण्याची स्थायी व्यवस्था निर्माण केल्याचे निदर्शनास येत नाही.

अशाप्रकारे पुस्तकातील नागरिकशास्त्र आणि प्रत्यक्ष व्यवहारातील किंवा जगण्यातील नागरिकशास्त्र यांचे ताळमेळ बसविणे अवघड झाल्याचे दिसत आहे. शालेय नागरिकशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात त्यामुळे नक्कीच मोठा गोंधळ उडतो आणि पुस्तक सर्वथा खोटारडे असल्याचे किंवा काहीच कामाचे नसल्याचे वाटायला लागते. त्यामुळेच प्रश्न पडतो की आपण नागरिकशास्त्र बदलून टाकावे काय? सुरू असलेली जगरहाटी, रूढ पद्धती, किंवा व्यवहारांप्रमाणे नागरिकशास्त्राच्या पुस्तकांचे पुनर्लिखाण केले जावे काय?

या प्रश्नांचे उत्तर आपण ठामपणे 'नाही' असेच द्यायला हवे. नागरिकशास्त्र पुस्तकाचा आधार भारताचे संविधान आहे. आपण मतदारांची बांधिलकी कोणत्याही पुढारी, राजकीय पक्ष, इत्यादि प्रती नसून, फक्त आणि फक्त भारताचे संविधान प्रती आहे. म्हणूनच आपण आपला व्यवहार संविधान अनुसार केलेला अधिक योग्य ठरेल.

त्यामुळे या निवडणुकीत मतदारांना आवाहन आहे की त्यांनी आपआपल्या विधानसभा मतदारसंघात नागरिकशास्त्र अवतरीत करावे. 'विकास'च्या आमिषात अडकून आपले मत विकू नये. विधानसभेकरीता निश्चित करण्यात आलेली तीन संवैधानिक कर्तव्ये आणि लोकांचे प्रतिनिधीत्व सक्षमपणे पूर्ण करू शकणाऱ्या उमेदवारांचा शोध घ्यावा व त्यांना निवडून आणावे. असे उमेदवार न आढळल्यास 'नोटा' (वरील पैकी कुणीही नाही - नकारार्थी मतदान) चा पर्याय मतदारांना खुला आहे.

'नोटा'ला बहुमत मिळाल्यास नव्याने निवडणूक केली जाणे व त्यात या नाकारल्या गेलेल्या उमेदवारांना बंदी असणे, अशी कायदेशीर सुधारणा घडवून आणण्यासाठी लोकप्रतिनिधींवर दबाव टाकणे, हे सुद्धा मतदारांचे आजचे संविधान पुरक 'विधान कार्य' आहे.

-----------------------------

राहुल बैस, मु.पो. अंजनगावबारी, व्हाया बडनेरा, ता.जि. अमरावती. पिन-४४४७०१.
दूरभाष क्र. ९४२३१०२९८३, ईमेल : rahulbais@gmail.com